वर्ष-०७ | अंक-१३ | मुंबई, मंगळवार १६ ते २२ फेब्रुवारी २०२१ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION
NO. PLG/205/2019-2021

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक ●कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक ● सह संपादक : सौ. अश्विनी नाईक परब

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

PG 2
टेलरच्या टॅगवरून 'त्या' हत्येचा लागला छडा

3 → शिक्षकांनीच केला विद्यार्थिनीचा विनयभंग

तक्रारदार महिलेनेच केला खून; 'असा' लागला छडा ← 4

## अपघातातील मृतांबद्दल मुख्यमंत्र्यांकडून शोक, वारसांना सरकारी मदत जाहीर



जळगाव - तालुक्यातील अभोडा, केऱ्हाळे, विवरे, रावेर येथील हातावर पोट असलेले मजूर बायका पोरांसह धुळे जिल्ह्यातील शहादा तालूक्यात पपई भरून आणण्याच्या हातमजुरीसाठी नेहमीप्रमाणे जात असताना भीषण अपघात झाला. या अपघातात एक दाम्पत्य, तीन कुटूंबातील मायलेकी व मायलेकांसह ११ जण अभोडा येथील, दोन रावेर तर केऱ्हाळे व विवरे येथील एकेक जण असे एकूण १५ जण पपईने भरलेला ट्रक किनगावनजीक पलटल्याने आज पहाटे जागीच ठार झाल्याची घटना घडली आहे. सर्वत्र हाहाकार उडवणाऱ्या या घटनेने अभोडा, विवरे, केऱ्हाळे व रावेर शहरासह तालूक्यात एकच शोककळा पसरली आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी या घटनेची दखल घेत, मृतांच्या कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त केल्या आहेत. मुख्यमंत्री कार्यालयाकडून ट्विट करुन मृतांच्या वारसांना सरकारकडून 2 लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. तसेच, जखमींवरील उपचाराचा खर्चही शासन करणार असल्याचे सांगण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांनी घटनेची माहिती जिल्हा प्रशासनाकडून घेतली असून संबंधित अपघातग्रस्तांना सर्व ती आवश्यक मदत करण्याचे निर्देश दिले आहेत. धुळे जिल्ह्यातील शहादा येथे पपई भरून आणण्याच्या हातमजूरीसाठी गेलेल्या तालुक्यातील हे मजूर रविवारी ट्रकमध्ये पपई भरून रावेरला आणत असताना क्रूर नियतीने झडप घालून यावल तालुक्यातील किनगावजवळ बऱ्हाणपूर - अंकलेश्वर राज्य महामार्गावर ट्रक पलटी झाल्याने अभोडा येथील एकाच आप्तपरिवारातील ...पान २ वर...

### उपमुख्यमंत्र्यांनीही व्यक्त केला शोक



जळगाव जिल्ह्याच्या यावल तालुक्यातील किनगाव हद्दीत पपई घेऊन जाणाऱ्या टेम्पो उलटून पंधरा मजूरांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत दुर्दैवी, क्लेशदायक असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दुर्घटनेतील मृत बांधवांना श्रद्धांजली वाहिली. मृत व्यक्तींच्या कुटुंबियांबद्दल उपमुख्यमंत्र्यांनी सहसंवेदना व्यक्त केली असून अपघातातील जखमींची प्रकृती लवकर सुधारावी, अशी प्रार्थनाही त्यांनी केली. अपघातस्थळी धाव घेऊन तातडीने मदतकार्य करणाऱ्या ग्रामस्थ, पोलिस, मदत पथकाचे उपमुख्यमंत्र्यांनी आभार मानले आहेत.

## नेहरुनगर, टिळकनगरमध्ये वेगाने रुग्णवाढ



मुंबई : मुंबईच्या पूर्व उपनगरात गेल्या काही दिवसांपासून रुग्णवाढ वेगाने होऊ लागली आहे. त्यातही कु र्ला नेहरूनगर आणि टिळकनगर भागात रुग्णांची संख्या वाढत असून या परिसरात शनिवारी आणि रविवारी एकत्रित विशेष तपासणी ...पान २ वर...

## पालिकेच्या अर्थसंकल्पात बदल करुन वाढीव निधीसाठी प्रयत्न



मुंबई : मुंबई महापालिके चा अर्थसंकल्प मंजूर करण्यापूर्वी दरवर्षी प्रमाणे यंदाही त्यात बदल ...पान २ वर...

## पत्ता विचारण्याच्या बहाण्याने पोलिसाच्या मुलीची चोरट्यांनी गळ्यातील सोनसाखळी हिसकावली



यवतमाळ : येथील उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या वाचक फाजदाराच्या मुलीच्या गळ्यातील आठ ग्रॅम वजनाची सोनसाखळी दुचाकीवरून आलेल्या दोघांनी हिसकावून नेली. ही घटना सोमवारी दुपारी १.३० वाजताच्या सुमारास गोदणी रोडवरील अवधुतवाडी पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर घडली.सदर तरुणी दुचाकीने जात असताना पत्ता विचारण्याच्या बहाण्याने मोटरसायकलवरून आलेल्या दोघांनी तिला थांबविले. यावेळी तिच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावून त्यांनी पोबारा केला. चापमनवाडीत ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच अवधुतवाडी पोलीस ठाण्यातील शोध पथक दाखल झाले. त्यांनी या चोरट्यांची शोधमोहीम चालविली आहे. फाजदाराची मुलगी आणि त्यातही पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर घडलेल्या या घटनेने पोलीस दलात खळबळ निर्माण झाली आहे.गेल्या काही दिवसांपासून यवतमाळ शहर व जिल्ह्यात मालमत्तेसंबंधीचे गुन्हे वाढले आहेत. मंगळसूत्र-चेन हिसकावणे, दुचाकी वाहनांची चोरी, घरफोडी हे प्रकार सर्रास घडत आहेत. हे गुन्हे उघडकीस आणण्याचे व घडण्यापूर्वी गुन्हा रोखण्याचे आव्हान पोलिसांपुढे आहे.

## शरीरास प्राणघातक अश्या अंमली पदार्थ स्वत:कडे बाळगणाऱ्या आरोपीला पोलीसांनी ठोकल्या बेड्या




मिळालेल्या माहितनुसार नालासोपारा येथे एक इसम गांजा अंमली पदार्थ स्वतःक्या कब्ज्यात बेकायदेशीर रित्या बाळगत असल्याची गुप्त बातमी वालीव पोलीस ठाण्याला मिळाली. माहिती मिळताच वालीव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चद्रकांत सरोदे व गुन्हाप्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांच्यासह सदर ठिकाणी सापळा लावून आरोपींना पकडण्यात आले. या गुन्ह्यात २ आरोपी असून पाहिल्या आरोपीचे वय-२४ वर्षे आणि दुसऱ्या आरोपीचे वय ३२ वर्षे आहे. दोघेही राहायला नालासोपारा (पूर्व) सदर आरोपींच्या कब्ज्यातून २किलो २६१ ग्रॅम वजनाचा गांजा एकूण किंमत २२,६१६/- रुपये किमतीचा बाळगत असताना मिळून आल्याने त्यांच्या विरूद्ध वालीव पोलीस ठाणे गुन्हा रजि क्र. १५९/२०२१ एन. डी.पी. एस. कायदा १९८५ चे कलम ८(क), २२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. वरील कामगिरी श्री. प्रशांत वांघुडे, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-३ विरार, श्री अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विलास चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हाप्रकटीकरण अधिकारी व अंमलदार यांनी पर पडली.

## आठ महिन्यांच्या चिमुरडीची विक्री करणाऱ्या महिलेला केली अटक




विरार पच्छिम येथील एस. टी. स्टँड आवारातील नवनाथ रसवंती गृह या ठिकाणी आरोपी महिला वय - ३७ वर्षे व वय - ४० या दोघी राहायला नारंगी गाव यांनी आठ महिन्यांच्या अल्पवयीन मुलीला त्यांच्या आर्थिक फायद्यासाठी एका महिलेला वय - ५० वर्षे राहायला नालासोपारा व पिपला बिपिन उर्फ डॉक्टर जितेन वय - ४६ वर्षे राहायला निळमोरे गाव नालासोपारा यांच्यामार्फत विक्री करण्याकरिता येणार असल्याची माहिती विरार पोलीस ठाण्याला मिळाली. माहिती मिळताच विरार पोस्ट चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश वराडे पोलीस निरीक्षक श्री विवेक सोनावणे पोलीस उपनिरीक्षक श्री टेलर व पोलीस स्टाफ यांनी छापा टाकून आठ महिन्याच्या अल्पवयीन मुलीची सुटका करून वेश्या व्यवसायासाठी विक्री करणारे दलाल ०४ आरोपी यांच्याविरुद्ध विरार पोलीस ठाणे गु.रजि.नं १३६/२०२१ भाऊ.द.वि.स. कलम ३७० (१) ३४ सह बाल न्याय अधिनियम सन २०१५ कलम ७९,८१ प्रमाणे गुन्हा नोंद करून आरोपींना सदर गुन्ह्यांमध्ये अटक करण्यात आली आहे.सदरची कारवाई श्री प्रशांत वांगुळे पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ श्रीमती रेणुका बागडे सहाय्यक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सुरेश वराडे /श्री. विवेक सोनावणे आणि पथक यांनी केली आहे.

## भाडेकरुंची माहिती पोलीस ठाणेस देण्याबाबत फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम 144 (1) (2) अन्वये आदेश निर्गमित

मीरा-भाईंदर वसई-विरार आयुक्तालयात स्थलांतरित नागरिकांचे वास्तव्याचे प्रमाणात मोठ्या संख्येने वाढ झालेली आहे. स्थलांतरित इसमांना घर, सदनिका, हॉटेल, जागा, इत्यादी भाडेतत्त्वावर देताना संबंधित घर मालक हे भाडेकरूच्या ओळखी बाबत कोणतीही शहानिशा न करता नागरिकांना घरे भाड्याने देतात व त्यांच्याकडून ओळखी बाबत कोणतेही कागदपत्रे घेत नाहीत असे निदर्शनास आले आहे त्यापैकी काही लोक अवैध व्यवसाय गुन्हे व समाज विरोधी कृत्यांमध्ये सामील असल्याचे दिसून आले आहे. अशा काही इसमांमुळे निर्माण होऊ शकणाऱ्या संकटांवर प्रतिबंध करण्यासाठी त्यांची माहिती पोलिस ठाण्यात अद्यावत करणे आवश्यक आहे.मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील निवासी क्षेत्रात घर मालक यांनी सदनिका/ फ्लॅट, घर, हॉटेल, दुकान ,जागा भाड्याने देण्यापूर्वी भाडेकरूची शहानिशा करून संबंधित पोलीस ठाण्यात अवगत भाडेकरूची माहिती सादर करणेबाबत सीआरपीसी १४४ (१)(३)अन्वये आदेश निर्गमित करण्यात आला आहे. मीरा-भाईंदर




वसई-विरार आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीत व नागरिकांनी निवासी क्षेत्रांमध्ये सदनिका/फ्लॅट, घर दुकाने हॉटेल जागा इत्यादी नागरिकांना भाडेतत्वावर देताना संबंधित मालकांनी भाडेकरू इसमांनी व इस्टेट एजंट यांनी खालील नमूद मुद्द्याची माहिती संबंधित पोलीस ठाण्यास पुरववी असे आदेश देण्यात आले आहे.१) भाडेकरूच्या ओळखी बाबत त्याचे मूळ वास्तव्याचा पुरावा किंवा ओळखपत्राचा पुरावा,२) परकीय नागरिक संदर्भाने त्याचे पासपोर्टची झेरॉक्स आणि व्हिजाची झेराक्स,३) भाडेकरू इसमांचे नजीकच्या

काळातील छायाचित्र,४) भाडेकरू इसमांचे मूळ वास्तव्याचा पत्ता तेथील पोलीस ठाण्याचे नाव नोकरीचे/ व्यवसायाचे ठिकाण असे कागदपत्रे प्राप्त करून संबंधित पोलीस ठाण्यात ३ दिवसाचे आत माहिती द्यावी भाडेकरू इसमांची माहिती संबंधित पोलीस ठाण्याचे ईमेलवर, टपालाद्वारे किंवा पोलीस आयुक्तालयाचे वेबसाईट www.mbvv.mahapolice.gov.in वर द्यावी. जे कोणी सदर आदेशाचा भंग करतील ते भारतीय दंड संहिता कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र ठरतील.

## मुंबईसह नाशिक, पुणे ग्रामीण भागांत सर्वाधिक अपघात



मुंबई : वाहतूक नियमांचे उल्लंघन हे चालकाबरोबरच वाहनांतील सहप्रवासी तसेच अन्य वाहनातील प्रवासी आणि पादचाऱ्यांच्याही जिवावर बेतू शकते. नियम उल्लंघन के ल्यानेच राज्यात गेल्या वर्षी २४ हजार ९७१ अपघातांत ११ हजार ५६९ जणांचा मृत्यू झाला आहे. २०१९ च्या तुलनेत २०२० मध्ये रस्ते अपघातांत २४ टक्क्यांनी, तर प्राणांतिक अपघातांमध्ये १० टक्क्यांनी घट झाली आहे. करोनामुळे मार्च २०२० ते जून २०२० पर्यंत रस्त्यांवरील वाहन ...पान २ वर...

## वीज बिल न भरणाऱ्यांना बसणार शॉक, 80 लाख वीज कनेक्शन करणार कट

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत वीजबिल न भरणाऱ्यांच्या घरात अंधार करण्यासाठी सरकारी विद्युत कंपनी महावितरणाने कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. एकूण ६०,००



कोटी रुपयांची थकबाकी असल्याचे कंपनीने म्हटले आहे. पुनर्प्राप्त न झाल्यास वीजपुरवठा करणे शक्य होणार नाही. यामध्ये पहिले ज्यांनी गेल्या १० महिन्यांपासून बिले भरली नाहीत अशा लोकांचे कनेक्शन तोडले जाणार असल्याचे म्हटले आहे. मागील दहा महिन्यांपासून महावितरणने ८० लाख, २ हजार वीजग्राहक ज्यांनी वीज बिलाचे एक रुपयादेखील जमा केलेले नाही, त्यांचे वीज कनेक्शन खंडित करण्याच्या नोटिसा बजावल्या आहेत. यामध्ये भांडुप सर्कल म्हणजेच मुंबई, ठाणे शहर आणि नवी मुंबईला लागून असलेल्या भागातील १,६३,९१५ घरगुती आणि व्यावसायिक ग्राहकांचा समावेश आहे . या ग्राहकांवर सुमारे १७५ कोटी रुपयांचे कर्ज आहे. त्यांचे वीज कनेक्शन कापण्याची कारवाई सुरू झाली आहे. सुमारे २६,००० ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करून थकबाकी वसुली सुरू केली आहे. तसेच कल्याण-डोंबिवली, वसई-विरार, अंबरनाथ-बदलापूर इत्यादी भागातील २,२२,३९१ ग्राहकांनी गेल्या दहा महिन्यांत एकदाही पैसे दिले नाहीत. अशा ग्राहकांची २२२.५० कोटी रुपयांची थकबाकी आहे.

महावितरणकडून असे कळविण्यात आले आहे की, राज्यातील ४१ लाख, ७ हजार घरगुती ग्राहकांसह विविध प्रवर्गातील ८० लाख, ३२ हजार ग्राहक, एप्रिल २०२० ते जानेवारी २०२० या कालावधीत सलग १० महिन्यांच्या कालावधीतही ...पान २ वर...

## मुंबई पोलिसांचे ऑपरेशन ऑल आऊट



३९ फरार आरोपींना अटक, २५९ ठिकाणी कोम्बिंग ऑपरेशन

मुंबई शहरात शनिवारी रात्री उशिरा अचानक मुंबई पोलिसांनी ऑपरेशन ऑल आऊट केले. या कारवाईत पोलिसांनी 39 फरार आरोपींना अटक केली. एकूण 259 ठिकाणी कोम्बिंगऑपरेशन करण्यात आले तर 11 हजार 881 वाहनांची तपासणी करण्यात आली. त्यात 3 हजार 141 वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली असून ड्रंक ॲण्ड ड्राईव्हप्रकरणी ३१ जणांना अटक करण्यात आली होती.

शनिवारी रात्री अकरा ते पहाटे दोन वाजेपर्यंत अचानक मुंबई पोलिसांनी ऑल आऊट ऑपरेशन हाती घेतले.

पाच प्रादेशिक विभागाचे अतिरिक्त पोलीस आयुक्त, तेरा पोलीस उपायुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्त आणि 93 ...पान २ वर...

## चार कोटी ९८ लाखांचा खाद्यतेल साठा जप्त



अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने मुंबईसह पालघर जिल्ह्यातील अनेक ठिकाणी धाडी टाकल्या असून आठ खाद्यतेल रिपॅकर्स आणि घाऊक विक्रेते यांच्यावर कारवाई करण्यात आली. सर्व ठिकाणी मिळून एकूण 4,98,74,973 रुपयांचा खाद्यतेलाचा साठा जप्त करण्यात आला असून एकूण 93 खाद्यतेलाचे नमुने विश्लेषणार्थ घेण्यात आले आहेत. या धाडीत एकूण 30 अन्न सुरक्षा अधिकारी सहभागी झाले होते. राज्यातील जनतेच्या आरोग्याची प्रथम जबाबदारी लक्षात घेऊन, त्यांच्या दैनंदिन आहारातील परिणामकारक अन्न पदार्थाचा दर्जा तपासण्याची जाणीव लक्षात ठेवून प्रशासनास प्राप्त माहितीच्या आधारे धाडी टाकल्या जातात. राज्यातील अन्न व्यवसायाचा दर्जा उंचावणे तसेच अन्न व्यावसायिकांना अन्न सुरक्षा व मानके कायद्याच्या तरतुदींचे पालन करण्यासाठी मार्गदर्शन करणे हा देखील धाडीचा अन्य हेतू असतो. 16 जानेवारी, २०२१ शनिवार रोजी अशाच नियोजनाचा भाग म्हणून मुंबई आणि ठाणे ...पान २ वर...

# टेलरच्या टॅगवरुन 'त्या' हत्येचा लागला छडा

**टेलरच्या टॅगवरुन एका हत्येच्या घटनेचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे. अहमदनगरमधील श्रीगोंदा पोलिसांनी हा तपास केला असून, अवघ्या चार दिवसांत या घटनेचा तपास करुन पाच जणांना बेड्या ठोकल्या आहेत.**

नगर : पोलिसांनी चिकाटीने तपास केला तर, आरोपींनी कोणताही पुरावा न सोडलेल्या गुन्ह्यांचाही तपास लागू शकतो. श्रीगोंदा पोलिसांनीही अशाच एका हत्येच्या घटनेचा छडा लावला आहे. शिर नसलेल्या मृतदेहाची शर्टावरील टेलर मार्कच्या आधारे ओळख पटवली आणि त्यानंतर या प्रकरणाचा उलगडा झाला. पुणे जिल्ह्यातील व्यक्तीला तेथील आरोपींनी श्रीगोंदा तालुक्यात आणून त्याची हत्या केल्याचे स्पष्ट झाले असून, पोलिसांनी पाच जणांना अटक केली. चार दिवसांतच हा तपास पूर्ण झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, श्रीगोंदा तालुक्यातील शेडगाव शिवारात ८ फेब्रुवारीला शिर कापलेल्या अवस्थेतील पुरुषाचा पुरलेला मृतदेह आढळून आला. त्याची ओळख पटवणे हेच पोलिसांपुढील मोठे आव्हान होते. मात्र, पोलीस निरीक्षक रामराम ढिकले यांच्या पथकाने हा आव्हानात्मक तपास सुरू केला. मृतदेह कुजला होता. शिर नसल्याने ओळख पटवणेही अवघड. अशा परिस्थितीत मृतदेहाच्या शर्टावर टेलरचे नाव होते. शुभम टेलर्स, पुणे ४६ एवढेच नाव त्यावर होते. त्यानंतर पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला. परिसरातील मोबाइल टॉवरवरून डेटा घेतला. त्याचे विश्लेषण करण्यात आले. पोलिसांनी पुण्यात जाऊन हरवलेल्या व्यक्तींच्या नोंदी मिळविल्या. भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात मिळतीजुळती नोंद आढळून आली. रमेश सदाशिव जाधव (रा. आंबेगाव, जि. पुणे) हे २ फेब्रुवारीपासून बेपत्ता असल्याची नोंद होती. त्यांच्या नातेवाइकांकडे चौकशी केल्यावर ते शुभम टेलर्सकडूनच कपडे शिवून घेत असल्याचे समजले. त्यानंतर नातेवाइकांकडून मृताची ओळख पटविण्यात आली. मृतदेहाची



ओळख पटल्यानंतर आता पोलिसांनी आरोपींचा तपास सुरू केला. त्यासाठी मोबाइल टॉवरवरून मिळालेल्या माहितीचा उपयोग झाला. पुणे जिल्ह्यातील जे संशयित या भागात येऊन गेल्याचे आढळले, त्यांच्याकडे चौकशी सुरू झाली. बारामती, पाटण सातारा, कोळसेवाडी, कल्याण येथून तेजस भोसले, राजेश विठ्ठल गायकवाड, अमोल गोविंद कांबळे, प्रशांत बजरंग साबळे यांच्यासह एका महिलेला ताब्यात घेतले. त्यांच्याकडे कसून चौकशी केली असता, त्यांनी खुनाची कबुली दिली. मृत जाधव हा एका महिलेला त्रास देत असल्याने कट रचून खून केल्याची कबुली आरोपींनी दिली. जाधव याला जमीन दाखवण्याच्या बहाण्याने बारामती तालुक्यातील मळेगाव येथे बोलवण्यात आले. तेथून रात्रीच त्याला सिद्धटेकमार्गे श्रीगोंदा तालुक्यात आणले. तेथे धारदार शस्त्राने त्याचा खून केला. त्याचे शिर धडावेगळे करून पुरले.

दुसऱ्या दिवशी आरोपींनी ते शिर पुन्हा बाहेर काढून जाळून टाकले. ओळख पटू नये यासाठी आणि पुरावा नष्ट करण्यासाठी हा प्रकार केल्याची कबुली आरोपींनी पोलिसांकडे दिली आहे. पोलीस निरीक्षक रामराव ढिकले, पोलीस निरीक्षक अनिल कटके तसेच दिलीप तेजनकर, विठ्ठल पाटील, अंकुश ढवळे, प्रकाश मांडगे, दादा टाके, किरण बोराडे, अमोल कोतकर, विनायक जाधव, संजय काळे, गोकुळ इंगवले, राजु भोर, किरण जाधव, प्रशांत राठोड यांच्या पथकाने हा तपास केला. पोलिस अधीक्षक मनोज पाटील यांनी या पथकाचे कौतुक केले.

# अश्विनी बिद्रे हत्या प्रकरण: सरकारी वकिलांपुढे नवा पेच

**सहाय्यक पोलिस निरीक्षक अश्विनी बिद्रे हत्याकांडामुळे महाराष्ट्र पोलिसांची प्रतिमा मलिन झाली आहे. त्यामुळे हे प्रकरण सध्या सर्वच स्तरांतून गांभीर्याने घेतले गेले आहे.**



नवी मुंबई: सहाय्यक पोलिस निरीक्षक अश्विनी बिद्रे हत्याकांडामुळे महाराष्ट्र पोलिसांची प्रतिमा मलिन झाली आहे. त्यामुळे हे प्रकरण सध्या सर्वच स्तरांतून गांभीर्याने घेतले जात असताना काही पोलिस साक्षीदार मात्र न्यायालयात प्रश्नांची उत्तरे देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास येत आहे.

त्याचा या खटल्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याने या साक्षीदारांची राज्याच्या पोलिस महासंचालकांकडे तक्रार करणार असल्याचे विशेष सरकारी वकील ॲड. प्रदीप घरत यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले.

अश्विनी बिद्रे हत्याकांडप्रकरणी मुख्य साक्षीदारांची साक्ष संपल्यानंतर आता पनवेल जिल्हा सत्र न्यायालयाच्या न्यायाधीश माधुरी आनंद यांनी अन्य साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यास सुरुवात केली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने पोलिस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

गेल्या आठवड्यात झालेल्या सुनावणीच्या वेळी एका पोलिस कर्मचाऱ्याने दोन प्रश्नांची उत्तरे दिली नव्हती.

यावर विशेष सरकारी वकील प्रदीप घरत यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सरकारी साक्षीदारांनी अशा पद्धतीने न्यायालयात वर्तन केल्यास त्याचा खटल्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे अशा पोलिस कर्मचाऱ्यांची पोलिस महासंचालकांकडे तक्रार करण्यार असल्याचे घरत यांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, आम्हाला आवश्यक असलेली कागदपत्रे उपलब्ध होत नाहीत, असा कांगावा आरोपी पक्षाच्या वकिलांनी शुक्रवारी न्यायालयात केला. त्यामुळे खटल्याचे कामकाज झाले नाही. पुढील सुनावणी येत्या २६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. खटल्याच्या कामकाजात खोडा घालण्याचा प्रयत्न आरोपींकडून होत आहे, असा आरोप अश्विनी यांचे पती राजू गोरे यांनी केला आहे.

# वाहन चाचणी न देताच थेट 'लायसन्स'

मुंबई : नवीन वाहन प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षित चालकाला प्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) वाहन चाचणी न देताच थेट लायसन्स (अनुज्ञप्ती) मिळणार आहे. यासंदर्भात रस्ते वाहतूक मंत्रालयाने नुकतीच मसुदा अधिसूचना काढली आहे. त्यानु ुसार नवीन वाहन प्रशिक्षण केंद्र स्थापन केले जाणार आहेत.

सध्या राज्यात शासन मान्यतेनुसार खासगी वाहन प्रशिक्षण केंद्र असून यामध्ये चालकाला २१ दिवसांचे प्रशिक्षण दिले जाते. यातून बाहेर पडलेला चालक आरटीओत प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र सादर करतो. त्यानंतर सर्व कागदपत्रे पूर्ततेनंतर आरटीओकडून त्याची चाचणी घेतली जाते आणि त्यानंतर शिकाऊ लायसन्स मिळते. परंतु यातून कुशल चालक मिळतातच असे नाही.

त्यामुळे रस्ते वाहतूक मंत्रालयाने अद्ययावत असे वाहन प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेतला असून त्याची नुकतीच मसुदा अधिसूचना जारी केली आहे. त्यानुसार हे केंद्र स्थापन करण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या कंपन्या आणि कंत्राटदारांसमोर काही अटी असतील.


# वसई विरार शहर महानगरपालिका

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर सुचना नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका संबंधित कार्यालय(चंदनसार) येथे झालेल्या मालमत्ता धारकांच्या व्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय चंदनसार येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका याबाबतची नोंद घेतली जाईल.
कर वसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिके दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल

| अ.क्र | दिनांक | करनिर्धारण पुस्त | अनुसुचित दोन/तीन मधील नोटीसीची | मालमत्तचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्याचे नाव किंवा अभिहस्तांतन कत्याचे नाव | खदरीदाराचे किंवा अभिहस्तांतन कत्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वॉर्ड क्र. | मालमत्ता क्र. | | | | |
| १ | २०-०१-२०२१ | ५ | CH०५/२३/३८ | परमात्मा पार्क चंदनसार | आर.सी.सी | भवरलाल मुन्नीलाल परमार | प्राजक्ता नामदेव ओग |
| २ | २०-०१-२०२१ | ५ | CH०५/२३/३७ | परमात्मा पार्क चंदनसार | आर.सी.सी | पिंकीबेन क्रांतीलाल परमार | रुपाली प्रशांत पाटील |
| ३ | २०-०१-२०२१ | ७ | CH०५/४२३/८६ | गोवारी नगर चाळ, | सिमेंट विटा व पत्रा | दिपक बाळगोंडा बामणे | संतोष रामचंद्र राऊत |
| ४ | २०-०१-२०२१ | ७ | CH०७/४५८/१७३ | गोवारी नगर चाळ, | सिमेंट विटा व पत्रा | सतिश ज्योतिबा तेलवेकर | संतोष रामचंद्र राऊत |
| ५ | २०-०१-२०२१ | ५ | CH०५/१४३/१३ | गायत्री अपार्ट परमा त्मा पार्क चंदनसार | आर.सी.सी | पिंकी कि रण नायक | विशाल शिवाजी पुजारी |
| ६ | २०-०१-२०२१ | ७ | CH०७/१००७/३९ | अविनाश अपार्ट चंदनसार | आर.सी.सी | विधी मंजुनाथ गुडेकर | प्रशांत समाशेट्टी महेश वसंत पाटोळे |
| | २०-०१-२०२१ | ६ | CH०६/८९/१४/२ | बालाजी अपार्ट परमात्मा पार्क चंदनसार | आर.सी.सी | राऊल दिपक देसाई | प्रतिभा गजानन मगणेकर |
| ८ | २१-०१-२०२१ | २ | CH०२/३९३/१८ | ओम श्री सद्गुरु नित्यानंद कपा | आर.सी.सी | मंगेश महादेव मेस्त्रि | देवदास तानाजी गमणेकर |
| ९ | २१-०१-२०२१ | ३ | CH०३/२४/२५ | आर के चाळ गास कोपरी | सिमेंट विटा व पत्रा | दत्ताराम गोविंद बेकर | अरविंद धोंडू भालेकर |
| १० | २१-०१-२०२१ | ५ | CH०५/१७७/९ | वैष्णवी साई कॉम्प्लेक्स चंदनसार | आर.सी.सी | मोहम्मद सय्यद एन शेख | आनंद अशोक गायकवाड/अशोक हरिभाऊ गायकवाड |
| ११ | २१-०१-२०२१ | ७ | CH०७/४७१/७ | जिवदानी चाळ,चंदनसार | आर.सी.सी | दिनेश बाबुराव वैद | राजेश रोहन यादव/ललीतादेवी राजेश यादव |
| १२ | २१-०१-२०२१ | ५ | CH०५/१७२/१६९ | वैष्णवी इमारत चंदनसार | आर.सी.सी | विनोद रघुनाथ बाली | श्रेया सतिश गमरे/सतिश बगंगाधर गमरे |
| १३ | २१-०१-२०२१ | ५ | CH०५/१६५/४७ | वैष्णवी इमारत चंदनसार | आर.सी.सी | रिना संतोष गवळी | विरेन्द्र दत्ताराम शेटये/पुजा विरेन्द्र शेटये |
| १४ | २१-०१-२०२१ | ३ | CH०३/४६/५१ | सिध्दी विनायक अपार्ट,गासकोपरी | आर.सी.सी | सुजाता विलास बामणे | अमोल ज्ञानेश्वर साळवी |
| १५ | २१-०१-२०२१ | १ | CH०१/१३४/१२ | जिवदानी कृपा चाळ,चंदनसार | आर.सी.सी | विजय नारायण पाटील | स्वप्निल भिकाजी पाटील |
| १६ | २१-०१-२०२१ | १ | CH०१/७६८/१८ | वक्रतुंड चाळ,भाटपाडा,शिरगाव | आर.सी.सी. | सोहनलाल पृथ्वीराज लोहार | सुजीत आशिष जयस्वाल |
| १७ | २५-०१-२०२१ | ३ | CH०३/५४/७७ | जिवदानी डेव्हलपर्स चंदनसार | आर.सी.सी. | ज्ञानेश्वर पिलाजी पाटील | रश्मी राजेश पारुड |
| १८ | २८-०१-२०२१ | ७ | CH०७/४४९/१३१ | गोवारी नगर चाळ,बरफपाडा, | सिमेंट विटा व पत्रा | परेश परशुराम शिगवण | कमलंशकुमार विदयाशंकर शुक्ला |
| १९ | १८-०१-२०२१ | ६ | CH६/८८/९ | शुभम अपार्ट .चंदनसार | आर.सी.सी. | दिलीप गंदाधर संता | निलेश नारायण नागले |
| २० | ३०-०१-२०२१ | ७ | CH०७/१६५ | कौलारु घर भाटपाडा | सिमेंट विटा व पत्रा | हरिश्चंद्र लोग्या परेड | ज्योत्स्ना निलेश परेड |

जा.क्र.वविशम / प्रससी / २३७/२०२०-२१
दिनांक :- ११/०२/२०२१


## पृष्ठ १ वरुन

### नेहरुनगर, टिळकनगरमध्ये

मोहीम हाती घेण्यात आली.

गेल्या काही दिवसांपासून मुलुंड, कु र्ला आणि टिळकनगर परिसरातील रुग्णांची संख्या वाढत असल्याचे आढळून आले आहे. संपूर्ण मुंबईतील रुग्णवाढीचा सरासरी दर ०.१४ टक्के असताना चेंबूर, टिळकनगरचा भाग असलेल्या एम पश्चिम विभागात हाच दर ०.२८ टक्क्यांवर गेला आहे तर मुलुंडचा भाग असलेल्या टी विभागात ०.२२ टक्के आणि कु ल्याचा समावेश असलेल्या एल विभागात ०.१७ टक्के इतका झाला आहे. कु र्ला विभागातील नेहरूनगर आणि त्याला लागूनच असलेल्या एम पश्चिम विभागातील टिळक नगर भागातच रुग्णवाढ होत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे दोन विभागातील पालिका अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एकत्रित तपासणी मोहीम हाती घेतली आहे.

शनिवार आणि रविवार असे दोन दिवस या भागातील प्रत्येक इमारतीत, वसाहतीत जाऊन लोकांची तपासणी करण्यात आली. शरीराचे तापमान आणि प्राणवायूची पातळी तपासण्यात आली. संशयितांच्या करोना चाचण्या करण्यात आल्या. पालिकेच्या सर्व दवाखान्यांव्यतिरिक्त १६ ठिकाणी करोनाच्या चाचण्या के ल्या जात आहेत, तसेच विभाग कार्यालयात येणाऱ्या प्रत्येकाच्या चाचण्या केल्या जात आहेत. तर नेहरूनगर टर्मिनसवरही परराज्यातून आलेल्यांच्या चाचण्या केल्या जात असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.मुंबईत ६४५ नवे रुग्ण, ४ मृत्यू

मुंबईत रविवारी ६४५ नव्या रुग्णांची नोंद झाली तर ४ रुग्णांचा मृत्यू झाला. रुग्णवाढीचाही दर वाढला असून दुपटीचा कालावधीही कमी झाला आहे. गेल्या कित्येक दिवसांपासून मुंबईतील रुग्णवाढीचा सरासरी दर ०.१२ टक्के होता तो वाढून ०.१४ टक्क्यांवर गेला आहे. तर रुग्णदुपटीचा कालावधी ४७९ दिवसांपर्यंत खाली घसरला आहे. हाच कालावधी ८ फे ब्रुवारीला ५७४ दिवस होता. मुंबईतील एकूण बाधितांची संख्या ३,१४,०७६ झाली आहे. तर आतापर्यंत २ लाख ९६ हजारांहून अधिक रुग्ण म्हणजेच ९४ टक्के रुग्ण करोनामुक्त झाले आहेत. सध्या ५६०८ रुग्ण उपचाराधीन आहेत. दरम्यान, चाचण्यांच्या तुलनेत बाधित आढळण्याचे प्रमाणही वाढले असून शनिवारी १६,३०० चाचण्या करण्यात आल्या आहेत. आतापर्यंत मुंबईत ३० लाख १४ हजारांहून अधिक चाचण्या करण्यात आल्या आहेत.

एल विभागात रुग्ण मोठ्या संख्येने आढळू लागल्यानंतर आम्ही रुग्णसंख्येचा अभ्यास केला. नेहरूनगर भागात गेल्या पंधरा दिवसांत ६३ नव्या रुग्णांची नोंद झाली. ३० वेगवेगळ्या इमारतींमध्ये हे रुग्ण विखुरलेले होते. त्यामुळे इमारत प्रतिबंधित करता येत नव्हती. टिळकनगर येथेही अशीच परिस्थिती होती. या भागात पंधरा दिवसांत १०० रुग्ण आढळून आले आहेत. – डॉ. जितेंद्र जाधव, एल विभागाचे आरोग्य अधिकारी

### पालिकेच्या अर्थसंकल्पात बदल

करून राजकीय पक्षांसाठी वाढीव निधी मिळवण्याचा प्रयत्न स्थायी समितीतर्फे केला जाणार आहे. निवडणुकीला एक वर्ष उरल्यामुळे प्रभागात विविध आकर्षक विकासकामे नगरसेवकांकडून सुचवली जाणार आहेत. त्याकरिता मोठ्या प्रमाणावर वाढीव निधीची तरतूद के ली जाण्याची शक्यता आहे. यावर्षी राजकीय पक्षांसाठी ६०० कोटींचा निधी देण्यात आला होता. यंदा मात्र एका बाजूला पालिकेचे उत्पन्न घटलेले असताना बदल करून किती निधी पक्षांना मिळणार याबाबत उत्सुकता आहे.

मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प पालिका आयुक्तांनी नुकताच मांडला. हा अर्थसंकल्प स्थायी समितीच्या पटलावर मांडण्यात आला असून गेल्या आठवड्यापासून स्थायी समितीच्या विशेष सभांमध्ये त्यावर चर्चा सुरू झाली आहे. अर्थसंकल्प स्थायी समितीत मंजूर करताना दरवर्षी त्यात बदल करून शेकडो कोटी रुपयांचा निधी नगरसेवकांनी सुचवलेल्या कामांसाठी वापरला जातो. चालू आर्थिक वर्षात अशा प्रकारची ६०० कोटी रुपयांचे बदल करण्यात आले आहेत. पक्षीय संख्याबलानुसार त्याचे वाटप के ले जाते. नगरसेवकांना दरवर्षी एक कोटींचा विकास निधी समान मिळतो. मात्र हा निधी ठरावीक कामांसाठी वापरता येतो. याशिवाय काही वेगळी कल्पक विकास कामे करायची असल्यास त्याकरिता स्थायी समितीकडून काही लाख किवा कोटींचा निधी नगरसेवकांना मिळवता येतो. त्याकरिता स्थायी समितीकडे तशा सूचना कराव्या लागतात. पुढील वर्षी फे ब्रुवारी महिन्यात पालिके च्या निवडणुका असल्यामुळे नगरसेवक आपापल्या विभागातील लोकांची मते मिळवण्यासाठी जास्तीत जास्त विकासकामे करून घेण्याचा सपाटा लावणार यात शंका नाही. त्यामुळे यंदा स्थायी समितीकडे जादा निधीची मागणी नगरसेवकांकडून के ली जात आहे.

### मुंबईसह नाशिक, पुणे ग्रामीण भागांत

संख्या कमीच होती. त्यामुळे अपघातांचे प्रमाण काहीसे कमी झाल्याचा अंदाज महामार्ग पोलिसांनी व्यक्त के ला आहे.

अपघात कमी करण्यासाठी नियम मोडणाऱ्या वाहन चालकांविरोधात महामार्ग पोलीस, परिवहन विभाग कठोर कारवाई करतानाच जनजागृतीही करतात. तरीही चालकांनी त्याकडे दुर्लक्षच केल्याने दरवर्षी राज्यात साधारण ३० हजारांच्या पुढे रस्ते अपघात होतात.

पोलिसांकडून प्रशिक्षण

अपघातग्रस्तांना तात्काळ मदत मिळण्यासाठी 'गोल्डन अवर्स' महत्त्वाचा ठरतो. अपघातग्रस्तांना त्वरित प्रथमोपचार मिळून त्यांचे प्राण वाचवण्यासाठी महामार्ग पोलिसांनी गावकरी, पेट्रोल पंप, टोल नाके व ढाब्यावरील कर्मचारी,

दुकानदार यांची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे.

### चार कोटी ९८ लाखांचा

परिसरातील काही खाद्यतेल व्यवसायांवर धाडी घालण्यात आल्या.

या धाडीत मुंबई परिसरातील मे. आयता एन्टरप्रायजेस प्रा.लि., बोरीवली (पश्चिम), मुंबई, मे. अष्टमंगल ऑईल मार्केटिंग प्रा.लि.,गोरेगाव (पश्चिम), मुंबई 86 व ठाणे परिसरातील मे. सदानंद ऑईल ट्रेडर्स, वसई, जि. ठाणे, मे. गौतम एन्टरप्रायजेस, वाशी, नवी मुंबई, मे. शिवशक्ती एन्टरप्रायजेस, वाशी, नवी मुंबई, मे. गॅलक्सी एन्टरप्रायजेस, काल्हेर, ता. भिवंडी, मे. गुलाब ऑईल अँड फुड इंडस्ट्रिज, वसई (पूर्व), जि. पालघर आणि मे. आशिर्वाद ऑईल डेपो, मिरा रोड, जि. ठाणे या आठ खाद्यतेल रिपॅकर्स व घाऊक विक्रेते यांच्यावर कारवाई करण्यात आली. सर्व ठिकाणी एकूण 4,98,74,973/रुपयांचा खाद्य तेलाचा साठा जप्त करण्यात आला. 93 खाद्यतेलाचे नमुने विश्लेषणार्थ घेण्यात आले.

धाडीचा परिणाम तपासता यावा म्हणून प्रथम प्राधान्याने विश्लेषण अहवाल मागवण्यात आले. तपासण्यात आलेल्या नमुन्यापैकी मे. गुलाब ऑईल अँड फुड इंडस्ट्रिज, वसई (पूर्व), जि. पालघर या पेढीतून घेण्यात आलेल्या 14 पैकी 14 नमुने प्रमाणित असल्याचे आढळून आले आहे. तसेच घेण्यात आलेल्या एकूण 93 खाद्यतेलाच्या नमुन्यांपैकी अप्रमाणित दर्जाचे 49 नमुने आढळून आले आणि 44 नमुने प्रमाणित दर्जाचे आढळून आले.

### अपघातातील मृतांबद्दल मुख्यमंत्र्यांकडून

११ जणांवर झडप घातल्याने अभोडा गावावर शोककळा पसरली.मृतांची नावेमृतांमध्ये अशोक जगन वाघ (वय ४०), संगिता अशोक वाघ (वय २५) या दाम्पत्यासह त्यांची लहानगा मुलगा सागर अशोक वाघ (वय ०३ वर्षे)व नरेंद्र वामन वाघ (वय २५) हे एकाच परिवारातील चार सदस्य कमलाबाई रमेश मोरे (वय ४५) यांची शारदा रमेश मोरे (वय १५) व गणेश रमेश मोरे (वय ०५) वर्षे ही दोन्ही मुल मुली , संदीप युवराज भालेराव (वय २५) व दुर्गाबाई संदीप भालेराव (वय २०) हे दाम्पत्य, सबनूर हूसेन तडवी (वय ५३) व दिलदार हुसेन तडवी (वय २०) हे मायलेकांसह रावेर येथील शेख हुसेन शेख मण्यार फकीरवाडा रावेर,

### वीज बिल न भरणाऱ्यांना

एकही बिल भरले नाही. बिलाची तिमाही ठेव १३ फेब्रुवारी पर्यंत ३६ लाख, एप्रिल २०२० पासून ५२ हजाराहून अधिक ग्राहकांनी बिले भरली नाहीत. अशा परिस्थितीत सरकारी कंपनीने वीज बिल न भरणाऱ्यांना बिल भरण्याचे आवाहन केले आहे. एप्रिल २०२० ते जानेवारी २०२० दरम्यान कोणत्याही ग्राहकांचे बिल न भरल्यामुळे वीज कनेक्शन तोडण्यात आले नाही. कोरोनाच्या वेळी देण्यात आलेल्या सुटकेचा फायदा लोक घेत आहेत. नेत्यांनी अशा लोकांना बढतीही दिली, त्यामुळे त्यांचा मूड वाढला, हे त्यांनी कबूल केले. म्हणूनच आज ते वीजबिल भरत नाहीत, परंतु आता जर वीज बिले दिली नाहीत तर त्यांना वीज कंपन्यांना पैसे देता येणार नाहीत. याद्वारे आम्ही वीजपुरवठा करू शकणार नाही.

### मुंबई पोलिसांचे

पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपल्या हद्दीत विशेष मोहीम हाती घेतली होती. या कारवाईत पोलिसांनी 223 ठिकाणी कोम्बिंग ऑपरेशन

केले, त्यात अभिलेखावरील 1 हजार 278 आरोपी आणि दत्तक योजनेअंतर्गत 1 हजार 561 आरोपी तपासण्यात आले तर 599 आरोपी सापडले. 39 फरारी आरोपींवर अटकेची कारवाई करण्यात आली.

## संपादकीय...



# व्यर्थी अधिकचि अर्थ वसे

संसदेतील अर्थसंकल्पावरील चर्चा समाप्त झाली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि त्यांचे कनिष्ठ मंत्री अनुराग ठाकूर यांनी या चर्चेला उत्तरही दिले आहे. पण विशेष म्हणजे, दोन्ही सभागृहांमधले सत्ताधारी पक्षाचे सदस्य आणि मंत्री ही अर्थसंकल्पावरची चर्चा आहे, अशी आठवण विरोधकांना सातत्याने करून देत होते. त्याच वेळी, काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांच्यासहित बहुतेक विरोधी सदस्य अर्थसंकल्पावर चर्चा करताना दिल्लीच्या सीमेवर आंदोलनास बसलेल्या शेतकऱ्यांचा आणि तीन कृषी विधेयकांचा विषय आवर्जून मांडत होते. राहुल गांधी यांनी तर आपले लोकसभेतले सारे भाषण केवळ शेतकऱ्यांच्याच प्रश्नांवर आणि या विधेयकांवर केले. यावेळी, वाद इतका वाढला, की दोन्ही बाजूंच्या ज्येष्ठ सदस्यांनी बजेटवरील चर्चेत हा मुद्दा येणे योग्य की अयोग्य, याचा नियमांची पुस्तके काढून कीस काढला. केंद्र सरकार या प्रकरणात कसे अडचणीत आले आहे हे तर यातून



दिसलेच; पण एरवी करोनाच्या संकटाच्या साऱ्या मर्यादा सांभाळून मांडल्या गेलेल्या एका चांगल्या अर्थसंकल्पाच्या चर्चेवर सावट राहिले ते शेतकऱ्यांच्या आंदोलनाचेच. त्यामुळे, सभागृहात उंच आणि टिपेच्या आवाजात जोरदार प्रत्युत्तरे देणाऱ्या अर्थमंत्र्यांना राहुल गांधी व इतरांचे भाषण व्यर्थ वाटले असले तरी अर्थसंकल्पाच्या आकडेवारीत खरा अर्थ नसून तो शेतकऱ्यांच्या आंदोलनात आहे, हे विरोधकांनाही माहीत होते. त्यातच, राहुल यांनी 'हम दो, हमारे दो' या एके काळी गाजलेल्या कुटुंब नियोजनाच्या घोषणेचा वारंवार उल्लेख करून सरकार पक्षाला जेरीस आणले. संसदेत मंजूर झालेल्या कृषी कायद्यांमुळे देशातील दोनच सर्वांत बड्या उद्योगपतींचा फायदा होणार आहे, हा राहुल गांधी यांचा आक्षेप होता. त्यामुळे, सरकार 'चालवणारे दोघे आणि त्यांचे लाडके दोघे' असा हा हिशेब होता. त्यांनी केलेला 'क्रॉनी कॅपिटॅलिझम' म्हणजे 'टोळक्याची संगनमत भांडवलशाही'चा उल्लेख अर्थमंत्र्यांना बराच लागला असावा. त्यामुळे, त्यांनी आपल्या उत्तरात शेतकऱ्यांच्या खात्यात गेलेले पैसे, रोजगार हमीचे पैसे, ग्रामसडक योजना, जवानांची पेन्शन, निराधारांच्या खात्यात थेट जमा होणाऱ्या रकमा यांचा उल्लेख केला. आपल्या प्रदीर्घ उत्तरानंतरही सीतारामन आणि ठाकूर यांना राहुल गांधी यांच्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारला धारेवर धरणाऱ्या आक्रमक भाषणाचा परिणाम पुरता पुसून टाकता आला नाही. भारतीय अर्थकारणाचा कणा असलेल्या शेतकऱ्याने आणि कृषी क्षेत्रानेच करोना काळात अर्थव्यवस्था तारून नेली, हे सर्वांना मान्यच आहे. संसदेतील भाषणांमध्येही याचा उल्लेख दोन्ही बाजूंच्या सदस्यांनी या चर्चेत केला. असे असतानाही हा शेतकरी राजधानीच्या सीमेवर आंदोलन करीत असताना त्याला दूर ठेवून अर्थव्यवस्थेची किंवा बजेटचीही अर्थपूर्ण चर्चा होऊ शकत नाही. ती अपुरी किंवा प्रसंगी दिशाभूल करणारीही ठरू शकते. राहुल गांधी बजेटवरील भाषणात शेतकऱ्यांचे प्रश्न मांडून हेच अधोरेखित करीत होते. मात्र, सत्ताधारी सदस्यांनी त्यांची खिल्ली उडविण्यात समाधान मानले. दुसरीकडे, नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री असताना त्यांच्या नेतृत्वाखालील समितीने कृषी प्रश्नांवरील एक अहवाल केंद्र सरकारला सादर केला होता. त्या अहवालात 'खासगी व्यापाऱ्यांनी बाजार समित्यांना बाजूला ठेवून धान्यमालाची खरेदी केली तरी त्यांच्यावर किमान आधारभूत किंमत अदा करण्याचे बंधन हवे,' अशी शिफारस केली होती. काँग्रेसचे राज्यसभेतील प्रतोद जयराम रमेश यांनी २०११ मधला हा अहवाल नजरेस आणला आहे. काँग्रेस कृषी क्षेत्र मुक्त करण्याचे २०१९च्या जाहीरनाम्यातील आश्वासन विसरत आहे, असे अर्थमंत्र्यांनी लोकसभेत म्हटले होते. या दोन्हींचा अर्थ इतकाच, की शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तुम्ही अप्रामाणिक भूमिका घेत आहात, अशी परस्परांवर टीका करण्याची चढाओढ काँग्रेस आणि भाजपमध्ये लागली आहे. तशी ती लागल्याने बजेटमधील काही गोष्टींकडे दुर्लक्ष झाले आहे. त्यातली एक म्हणजे, गेल्या पाच वर्षांत ग्रामीण रोजगार हमीवरील सातत्याने वाढलेला व प्रत्यक्ष झालेला खर्च. यंदा तर तो करोनामुळे विक्रमी झाला. या खर्चामुळे, ग्रामीण भागात पैसा पोहोचला आणि देशांतर्गत मागणी वाढली.

दुसरे म्हणजे, सगळ्या देशातच रस्ते, महामार्ग आणि ग्रामीण घरबांधणीचे काम मोठ्या प्रमाणात झाले आहे. त्यातूनही पैसा ग्रामीण भागात गेला आहे. असे असले तरी केंद्र सरकारला निदान मुद्दे अधिक पारदर्शकपणे हाताळावे दिसतील. पहिला, मोजक्या पण लाडक्या उद्योगपतींना मोकळे रान दिल्याचा आणि दुसरा, कृषी कायद्यांचे फायदे विरोधकांसहित शेतकऱ्यांना निर्णायकपणे पटवून देण्याचा.

# विज्ञान प्रसाराला हवे बळ

सांस्कृतिक, साहित्यिक, सांगीतिक, सामाजिक, राजकीय, वैज्ञानिक, पर्यावरणविषयक अशा विविध कार्यक्रमांची रेलचेल हे पुण्याचे वैशिष्ट्य. पुण्यात सतत कोणते ना कोणते कार्यक्रम होत असतात. कोव्हिडमधून सावरताना पुणे हळूहळू पूर्वपदाला येऊ लागले आहे, मर्यादित स्वरूपात का होईना, कार्यक्रम सुरू होताहेत. या पार्श्वभूमीवर, ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. जयंत नारळीकर यांची अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याचे वृत्त आले आणि पुण्याच्या साहित्यिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक जगतात चैतन्याचे वारे वाहू लागले. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ असलेले प्रा. नारळीकर यांनी मराठीत अस्सल विज्ञानकथांची पायवाट प्रशस्त केली; त्याहून महत्त्वाचे म्हणजे विज्ञानप्रसाराच्या कार्याला गती दिली. त्यांना संमेलनाध्यक्षपदाचा बहुमान मिळणे ही आनंददायी बाब; मात्र या निमित्ताने पुण्यातील विज्ञान विषयक कार्यक्रमांच्या सद्यस्थितीबद्दल बोलणे गरजेचे आहे.

परवा परवापर्यंत पुण्यात वैज्ञानिक कार्यक्रम अतिशय जोरात होत असत. प्रा. नारळीकर, डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. वसंतराव गोवारीकर, डॉ. वि. ग. भिडे, प्रा. गोविंदस्वरूप, डॉ. विजय भटकर यांसारखे ज्येष्ठ शास्त्रज्ञ पुण्यातील अनेक कार्यक्रमांना जात, शाळा-महाविद्यालयांत जात. पुण्यातील अनेक शाळांमध्ये प्रा. नारळीकर यांनी खगोलशास्त्राचे तास रंगविले आहेत. साध्या पोस्टकार्डावर विचारलेल्या विज्ञानविषयक प्रश्नांना अतिशय आपुलकीने उत्तर देणे, ही त्यांची खासियत. डॉ. माशेलकर हेही उत्तम वक्ते. त्यांच्या उपस्थितीमुळे अनेक सार्वजनिक कार्यक्रमांची उंची वाढते. लोकसंख्येच्या प्रश्नांपासून हवामानशास्त्रापर्यंत अनेक विषयांवर डॉ. गोवारीकर यांनी केलेली भाषणे पुणेकरांच्या अजूनही स्मरणात असतील. प्रा. गोविंदस्वरूप साध्या-सोप्या इंग्लिशमधून खगोलविज्ञान उलगडत. डॉ. भिडे हेही निष्ठावंत विज्ञान प्रसारक. विद्यार्थ्यांत विज्ञानाबाबत गोडी वाढविण्यात, त्यांच्यापैकी काहींना मूलभूत विज्ञानाकडे आकर्षित करण्यात या शास्त्रज्ञांचा मोठा वाटा आहे.

या वलयांकित शास्त्रज्ञांमुळे; तसेच विविध राष्ट्रीय प्रयोगशाळांमुळे डॉ. एम. एस. स्वामीनाथन, डॉ. एपीजे अब्दुल कलाम, डॉ. सीएनआर राव, डॉ. राजा रामण्णा, डॉ. आर. चिदंबरम, डॉ. के. कस्तुरीरंगन असे शास्त्रज्ञ पुण्यात नित्यनेमाने येत; सार्वजनिक कार्यक्रमांनाही उपस्थित राहत. आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञांचे कार्यक्रमही अधूनमधून आयोजित केले जात. भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ डॉ. रॉजर पेनरोज यांचा २२-२३ वर्षांपूर्वी 'बालगंधर्व'मधील कार्यक्रम, त्याला उपस्थित असणाऱ्यांपैकी अनेकांच्या स्मरणात असेल. 'बालगंधर्व' खच्चून भरल्याने दोन रांगांच्या मधल्या भागात श्रोते बसले. त्याच काळात विज्ञान ऑलिम्पियाडबाबत जागरुकता वाढली आणि पुण्यातील अनेक विद्यार्थी खगोलशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित, रसायनशास्त्र आदी विविध ऑलिम्पियाडमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकले.


**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**
**COMPUTER DEPARTMENT**
Indira Gandhi Bhavan, ChattrapatiShivajiMaharajMarg, Bhayander (W) -401101
Tal.Dist. Thane 401101

MBMC/COMPUTER/ 374 /2020-21 Date: 12/02/2021

**//Tender Notice //**

Mira Bhaindar Municipal Corporation invites sealed tenders for following works. The tenders form and other relevant document will be available for download on MBMC E-Tendering website as https://mahatenders.gov.in from dt. 16/02/2021 to dt.24/02/2021 till 1.00 p.m. Tender form fee and EMD should be submitted through online Receipt system, failing which the tender will be disqualified.

The last date for submission of tenders computed in all respects on dt. 24/02/2021 up to 1.00 p.m. in the above mentioned website. If possible the tenders shall be opened in the presence of their bidders or there representative on the dt. 26/02/2021 up to 1.00 p.m. at the Tender cell of Mira Bhainder Municipal Corporation.

Hon. Commissioner of Mira Bhainder Municipal Corporation has reserve right to reject any or all online bids, without assigning any reasons.

| Sr. No. | Name of work | Cost of Tender Documents (in Rs.) | Earnest Money Deposit (EMD) | Estimated Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1) | Supply of Microsoft 365 Business Standard License to MBMC | Rs. 1,600- + Rs.288/- 18% GST = Rs.1,888/- (Non Refundable) | Rs. 7,500/- (Refundable) | Rs.3,37,500/- (+GST) |

Note:-

1 Tender Documents shall not be sent or received via post.
2 Tender Submission is online only.
3 EMD and Document fees shall be submitted though online receipt system available on e-tendering website.

जा.क्र मनपा/जनसंपर्क/ २९०/२०२०-२१
दिनांक १२/०२/२०२१

Sign/-
(R.M.Gharat)
System Manager
Mira Bhainder Municipal Corporation


# सिव्हिल रुग्णालयातून बालिकेची चोरी!

'हे भगवान, ये क्या हो गया? मेरी बच्ची को, कौन और क्यूं उठाके ले गया? मेरी बच्ची मुझे लौटा दो' असे म्हणत अगतिक मातेने एकच हंबरडा फोडला अन् सिव्हिल रुग्णालयामध्ये उपस्थित साऱ्यांचेच मन हेलावले. रुग्णालयामधून दीड वर्षांची बालिका चोरीला गेल्याची धक्कादायक घटना शनिवारी दुपारी उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. सीसीटीव्ही कार्यान्वित होताच पहिल्याच दिवशी बाळ चोरीला गेल्याने सिव्हिल रुग्णालय पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. चोरीला गेलेली बालिका मूळची उत्तर प्रदेशातील असून, आई वडिलांसमवेत ठाण्यातील रबाले परिसरात राहते. तिची मावशी अंबड परिसरात राहावयास आहे. तिला प्रसूतीसाठी दाखल करावयाचे असल्याने या बालिकेला घेऊन तिची आई नाशिकमध्ये आली होती. केसपेपर काढण्यापासून आवश्यक कागदपत्रे सादर करण्याची लगबग बालिकेची आई करू लागली. या दरम्यान, सव्वा ते दीड वर्ष वयाची ही बालिका झोपी गेली. तिला प्रसूती कक्षाबाहेरील व्हरांड्यात झोपवावे लागले.


**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जल व्यवस्थापन विभाग अंबरनाथ**

**निविदा सूचना क्र. ५ सन २०२०-२१**

महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, साई विभाग, रस्ता क्र. २, अंबरनाथ (पूर्व) दूरध्वनी क्रमांक ०२५१ २६०२३४८ यांनी खालील कामांसाठी दोन लिफाफा प्रणालीतील सीलबंद निविदा फॉर्म आमंत्रित केले आहे. रिक्त निविदा फॉर्म कार्यकारी अभियंता, एमजेपी, विभाग अंबरनाथ या कार्यालयात दिनांक १५/०२/२०२१ ते ०२/०३/२०२१ पर्यंत कार्यालयीन वेळेत जारी केले जातील. या कामाची सीलबंद निविदा दि. ०५/०३/२०२१ रोजी १५.०० वाजेपर्यंत किंवा आधी नमूद केलेल्या कोणत्याही कार्यालयात सादर करता येईल आणि शक्य असल्यास खालील नमूद तारखेला व वेळेवर एमजेपीच्या सक्षम प्राधिकरणाद्वारे उघडल्या जातील.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजीत किंमत (रू.) | इसारा रक्कम (रू.) | सुरक्षा अनामत रक्कम (४%) | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कोऱ्या निविदा फॉर्मची किंमत | म.जी.प्रा.कडे नोंदणीकृत कंत्राटदाराचा वर्ग | सिलबंद निविदा स्विकारण्याचा दिनांक व ठिकाण | सिलबंद निविदा उघडण्याचा दिनांक व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | अंबरनाथ पाणी पुरवठा योजने अंतर्गत बदलापूर येथील पाण्याची साठवण टाक्यांची सफाई करणे | २,८१,०५१/- | २,८११/- | एकूण सुरक्षा अनामत रक्कम रु. ११,२४२/- अ) प्रारंभिक सुरक्षा अनामत रक्कम रु. ५,६२१/- ब) चालू देयकातून वसुल होणारी रक्कम रु. ५,६२१/- | सहा महिने (०६ महिने) | रु.११२/- | वर्ग-६ व त्यावरील वर्गाचे कंत्राटदार | दि. ०५/०३/२०२१ रोजी १५.०० वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, साई विभाग, रस्ता क्र. २, अंबरनाथ (पूर्व) | दि. ०८/०३/२०२१ रोजी १२.०० वाजता. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, साई विभाग, रस्ता क्र. २, अंबरनाथ (पूर्व) |

क्र. जिमाका / ठाणे/ जाही/७६/२०२०-२१

सही/-
कार्यकारी अभियंता
म.जी.प्रा.ज.व्य.विभाग अंबरनाथ

टिप - १) सविस्तर निविदा सूचना कार्यकारी अभियंता, एमजेपी विभाग. अंबरनाथच्या सूचना फलकावर पाहिली जाऊ शकते. विनंती केल्यास त्याची प्रत विनामूल्य मिळू शकते.
२) अर्जासह खालील कागदपत्रे जमा करणाऱ्या कंत्राटदारांना रिक्त निविदा फॉर्म देण्यात येईल.
अ) वैध नोंदणी प्रमाणपत्र.
ब) रिक्त निविदा फॉर्मच्या किंमतीची भरपाई
क) जीएसटीसाठी नोंदणी प्रमाणपत्र
३) रिक्त निविदा फॉर्म पोस्टद्वारे पाठविल्या जाणार नाहीत. कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतीही कारणे न देता नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकरणाने राखून ठेवला आहे.


# चर्चमध्ये चोरी, पैसे आणि दानपेटीही पळवली



पुणे: खडकी परिसरातील एका चर्चमधून चोरट्यांनी दानपेटीच चोरून नेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी खडकी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, खडकीत एका शाळेतील विद्युत मोटार चोरल्याचे समोर आले आहे.

याबाबत जेसू अँथनी (वय ६८, रा. खडकी) यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खडकी परिसरात असलेल्या चर्चमधून चोरट्यांनी दानपेटी पळवून नेल्याचे जेसू यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी खडकी पोलिसांकडे तक्रार दिली. चर्चच्या उघड्या दरवाजातून प्रवेश करून चोरट्यांनी दानपेटीतील तीन हजारांची रोकड आणि दानपेटी असा चार हजारांचा ऐवज चोरून नेला. या प्रकरणी पोलिस हवालदार हनुमंत जाधव अधिक तपास करीत आहेत.

खडकी परिसरात शाळेच्या बागेतील झाडांना पाणी देण्यासाठी बसविलेली विद्युत पंपाची मोटार चोरून नेल्याची उघडकीस आली आहे. या प्रकरणी नरेंद्र भाईलाल (वय २८, रा. खडकी) यांनी खडकी पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार अज्ञात व्यक्तीच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खडकीत एपीपीएस शाळेतील बागेत झाडांना पाणी देण्यासाठी पंपाला मोटार बसविण्यात आली होती. ही मोटार चोरट्यांनी लंपास केली.

# पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार १६ ते २२ फेब्रुवारी २०२१


## तरुणाचा दगडाने ठेचून खून



पिंपरी : जमिनीच्या वादातून तरुणाचा दगडाने ठेचून निर्घृणपणे खून करण्यात आला. ही घटना शुक्रवारी (१२ फेब्रुवारी) तळवडे चाकण रस्त्यावर घडली. या प्रकरणी गुन्हे शाखा युनिट तीनच्या पथकाने दोघांना अटक केली आहे.

रोहन रवींद्र जगताप (वय २०, रा. निघोजे) आणि विशाल अशोक चव्हाण (वय २१, रा. देहूगाव) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यांच्यासह त्यांच्या महाराज (पूर्ण नाव व पत्ता माहिती नाही) नावाच्या साथीदाराच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संकेत गायकवाड (रा. निघोजे) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिस शिपाई कैलास उल्हारे यांनी देहूरोड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी रात्री देहूरोड पोलिस गस्त घालत होते. तळवडे-चाकण रस्त्याने जात असताना तळवडे स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्यावर एकाचा डोक्यात दगड घालून खून केला असल्याचे निदर्शनास आले. खून झालेला तरुण खेड तालुक्यातील निघोजे गावातील असल्याची माहिती गुन्हे शाखा युनिट तीनचे पोलिस उपनिरीक्षक प्रसन्न जऱ्हाड यांना मिळाली. संशयावरून पोलिसांनी जगताप आणि चव्हाण यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्हा कबुल केला.

## तक्रारदार महिलेनेच केला खून; 'असा' लागला छडा

**सातारा येथील फलटणमधील महिलेच्या हत्येच्या घटनेचा पोलिसांनी छडा लावला आहे. तक्रार करणाऱ्या महिलेने आणि तिच्या नातेवाइकांनीच महिलेची हत्या केल्याचे उघड झाले आहे.**

सातारा: फलटण तालुक्यातील पिंपरद येथील वृद्ध महिलेच्या खुनाच्या गुन्ह्यातील फिर्यादी व तिच्या घरातील लोकांनीच जमिनीच्या वादातून महिलेवर धारदार शस्त्राने वार करून, डोक्यात दगड घालून खून केला असल्याचे उघड झाले. स्थानिक गुन्हे शाखेने तपास करून या हत्येच्या घटनेचा छडा लावला. या प्रकरणात १३ जणांना पोलिसांनी अटक केली असून, यात मुख्य तक्रारदारासह चार महिलांचा समावेश आहे. अप्पर पोलीस अधीक्षक धीरज पाटील यांनी आज, सोमवारी ही माहिती दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फलटण तालुक्यातील पिंपरद गावच्या हद्दीतील म्हारकी शिवारातील गट क्रमांक तीनमधील वादग्रस्त जमिनीमध्ये माहुली उर्फ मौली झबझब पवार हिने झोपडी उभारली होती. तिचा १० तारखेला कुंडलिक कृष्णा भगत, सतीश उत्तम भगत, राजू प्रल्हाद मोरे, कुमार मच्छिंद्र मोरे व सुनील मोरे (सर्व राहणार पिंपरद) यांनी खून केल्याची फिर्याद कल्पना अशोक पवार (रा. अलगुडेवाडी, ता. फलटण) हिने दिली होती. यावरून वरील आरोपींना



पोलिसांनी ताब्यात घेतले होते. दरम्यान, फिर्यादी कल्पना पवार हिने दिलेल्या तक्रारीत आणि साक्षीदारांच्या जबाबात तफावत असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवून पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल व अप्पर पोलीस अधीक्षक धीरज पाटील यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किशोर धुमाळ यांना गुन्ह्याची सत्यता पडताळणी करण्याच्या सूचना केल्या. यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाची नेमणूक करण्यात आली. सदर पथकाने गुन्ह्याचा समांतर तपास करताना नमूद आरोपी, त्यांच्या घरातील लोक, प्रत्यक्षदर्शी व आजूबाजूच्या परिसरातील व गावातील रहिवाशी यांच्याकडे विचारपूस केली असता, हा गुन्हा फिर्यादीने नमूद केलेल्या लोकांनी केला नसल्याचे निदर्शनास आले.

## 26 वर्षीय घटस्फोटित महिलेला घरी बोलावले, खोलीत डांबून केला बलात्कार



हिसार: हरयाणाच्या हिसारमध्ये २६ वर्षीय घटस्फोटित महिलेवर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी महिलेच्या तक्रारीवरून आरोपीला अटक केली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, सिव्हिल लाइन पोलीस ठाण्यात एका २६ वर्षीय घटस्फोटित महिलेने तक्रार नोंदवली आहे. एका व्यक्तीने बलात्कार करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तिने तक्रारीत नमूद केले आहे. महिला घटस्फोटित असून, घर भाडेतत्वावर घेत होती. करार करण्यासाठी ती कोर्टात गेली होती. तिथे तिची ओळख शमशेर सिंह नावाच्या व्यक्तीशी झाली. भाडेकरार तयार करून देणार असल्याची बतावणी त्याने केली आणि त्याचा मोबाइल क्रमांकही तिला दिला. ११ फेब्रुवारीला त्याने मला कोर्ट परिसरात बोलावून घेतले. माझे घरही दाखवतो असे त्याने सांगितले. आरोपीने तिला सेक्टर १५ मधील घर दाखवण्यासाठी नेले. घर बघितल्यानंतर चहा घेऊन ती निघून गेली.

महिला भाडेकरारासंबंधित कागदपत्रे तिथेच विसरली होती. १२ फेब्रुवारीला त्याने पुन्हा घरी बोलावले. त्यानंतर खोलीत डांबले. तिथे त्याने बलात्कार केला, असे महिलेने तक्रारीत म्हटले आहे. आरोपीला विरोध केल्यानंतर त्याने महिलेला धमकावले. मुलालाही ठार मारेन अशी धमकी दिली. तसेच एक लाख रुपये देतो असे सांगून प्रकरण मिटवून टाक असेही सांगितले. महिलेने केलेल्या तक्रारीनुसार, आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून, त्याला अटक केली आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

## धक्कादायक! अनैतिक संबंधांवरुन सख्ख्या बहिणीची केली हत्या




बाराबंकी: उत्तर प्रदेशच्या बाराबंकीमध्ये भावानेच सख्ख्या बहिणीची हत्या केली. या हत्येच्या घटनेमागील कारण उघड झाल्यानंतर पोलिसांनाही धक्का बसला. पोलिसांनी आरोपी भावाला अटक केली आहे. अनैतिक संबंधांवरून आपल्या सख्ख्या बहिणीची निर्घृण हत्या केल्याचे पोलिसांनी सांगितले.

मिळालेल्या माहितीनुसार, बाराबंकी जिल्ह्यातील फतेहपुर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गुडौली गावात नात्याला काळिमा फासणारी घटना घडली. सेनपुरव गावात राहणाऱ्या भावाने आपल्या सख्ख्या बहिणीची हत्या केली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस तेथे पोहोचले. महिलेचा मृतदेह आढळून आला. त्यांनी मृतदेह विच्छेदनासाठी पाठवला आहे. पोलिसांनी तपास सुरू केल्यानंतर या हत्येचे कारण समोर आले. बहीण प्रियकरासोबत राहत असल्याचा राग त्याच्या मनात होता, अशी माहिती तपासात मिळाली. मृत महिलेचे लग्न काही दिवसांपूर्वी मोहम्मदपूर खाला पोलीस ठाण्याच्या हद्दीत झाले होते. मात्र, या महिलेचे अन्य एका तरुणासोबत प्रेमसंबंध होते. तिचे लग्न होऊनही ती त्याच्या संपर्कात होती. काही दिवसांनंतर ती सासरहून परतली आणि प्रियकरासोबत निघून गेली. यामुळे भावाच्या मनात प्रचंड राग होता. त्याचदरम्यान, मुलीच्या कृत्याने बदनामी झाल्याचे तिच्या वडिलांनी मुलाला सांगितले. काही दिवसांनी वडिलांचाही मृत्यू झाला. त्यानंतर भावाने बहिणीची हत्या करण्याचा कट रचला. प्रियकराच्या सोबत राहायचे आहे, तर त्याच्याकडे सोडून येतो, अशी बतावणी करून त्याने बहिणीला बोलावून घेतले. दुचाकीवर बसवून तो तिला फतेहपुर येथील गुडौली येथील नाल्याच्या जवळ एका निर्जन ठिकाणी घेऊन गेला. त्यानंतर तिथे त्याने बहिणीची हत्या केली. स्थानिकांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली. स्थानिकांकडे चौकशी केली असता, भावानेच बहिणीची हत्या केल्याचे पोलिसांना सांगितले. पोलिसांनी भावाला अटक करून कसून चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

## मुंबई: रेल्वे स्थानकात दारु पिऊन तरुणाचा धिंगाणा, उद्घोषक महिलेवर हल्ला, तोडफोड



मुंबई: मद्यधुंद तरुणाने शिवडी रेल्वे स्थानकात गोंधळ घातला. या तरुणाच्या हातात चाकू होता. त्याने रेल्वे स्थानकातील कार्यालयात असलेल्या महिला कर्मचाऱ्यावर हल्ला केला. रेल्वे स्थानकात सोमवारी सकाळी हा धक्कादायक प्रकार घडला.

रेल्वे स्थानकातील महिला कर्मचाऱ्याला या २२ वर्षीय तरुणाने चाकूचा धाक दाखवला. तिच्याकडे दारू मागितली. हातात चाकू घेऊन या तरुणाने रेल्वे स्थानक परिसरात धिंगाणा घातला.

दारूच्या नशेत या तरुणाने रेल्वे स्थानकातील कार्यालयात उद्घोषणा करणाऱ्या महिलेवर हल्ल्याचा प्रयत्न केला. या महिलेने कशीबशी स्वतःची सुटका करून घेतली. तिला कोणतीही दुखापत झाली नाही. तिने रेल्वे पोलिसांना पाचारण केले, अशी माहिती मध्य रेल्वेच्या प्रवक्त्यांनी दिली. त्यानंतर त्या ठिकाणी पोहोचलेल्या रेल्वे पोलीस कॉन्स्टेबलवर या तरुणाने हल्ला केला.

या घटनेने रेल्वे स्थानकात काही वेळ गोंधळ उडाला होता. रेल्वे स्थानकात तरूण हातात चाकू घेऊन फिरत असल्याने प्रवाशांमध्येही घबराट पसरली होती. रेल्वे पोलिसांनी या तरुणाला पकडले आणि रेल्वे स्टेशन मास्तरांच्या कार्यालयात नेले. तेथेही त्याने गोंधळ घातला आणि कार्यालयात तोडफोड केली. त्यानंतर या तरुणाची रेल्वे पोलिसांनी कोठडीत रवानगी केली. या घटनेचा पुढील तपास रेल्वे पोलीस करत आहेत.

## बाजारात जाण्यासाठी ती घराबाहेर पडली; दुसऱ्या दिवशी मिळाली धक्कादायक बातमी



गोपालगंज: बिहारच्या गोपालगंजमध्ये एका १६ वर्षीय मुलीचा मृतदेह झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात ही घटना घडली. मुलगी शनिवारी संध्याकाळी बाजारात जाण्यासाठी घराबाहेर पडली होती. मात्र, ती परतलीच नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी तिचा मृतदेह आढळला. या घटनेची माहिती मिळताच पोलीस तिथे पोहोचले. पोलिसांनी तपास सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुलगी आपल्या मामाच्या घरी राहात होती. नातेवाइकांच्या माहितीनुसार, मृत मुलीचे वडील काही वर्षांपूर्वी घर सोडून कुठेतरी निघून गेले होते. त्यानंतर तिची आई आपल्या पतीच्या शोधासाठी घरातून गेली ती परतलीच नाही. पतीला शोधताना ती नेपाळला गेल्याचे सांगण्यात येते. आई-वडील नसल्याने मुलगी घरात एकटीच होती. त्यानंतर ती आपल्या मामाच्या घरी राहायला गेली. तिथे ती घरातील कामे करायची. शनिवारी संध्याकाळी ती घरातून बाजारात गेली होती. संध्याकाळी उशिरापर्यंत ती घरी परतलीच नाही. रात्रभर तिचा सगळीकडे शोध घेण्यात आला. रविवारी सकाळी गावाबाहेरील एका झाडाला तिचा मृतदेह लटकलेला आढळून आल्याचे ग्रामस्थांनी नातेवाइकांना सांगितले. माहिती मिळताच ते घटनास्थळी गेले. त्यांनी मृत मुलीची ओळख पटवली. या मुलीची हत्या करून मृतदेह झाडाला लटकवल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये सुरू आहे. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलीस घटनास्थळी गेले. त्यांनी मृतदेह ताब्यात घेऊन विच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला. या घटनेचा तपास सुरू आहे.

## बारच्या बाहेर दोघे उभे होते, अचानक तिघे आले अन्...

**पालघर जिल्ह्यातील नालासोपारा पूर्वेकडील मोरगावमध्ये धक्कादायक घटना घडली. येथील एका बारबाहेर उभ्या असलेल्या दोघांवर तिघा अज्ञातांनी गोळीबार केला. यात दोघे जखमी झाले आहेत.**

पालघर जिल्ह्यातील नालासोपारा पूर्वेकडील मोरगावमध्ये धक्कादायक घटना घडली. येथील एका बारबाहेर उभ्या असलेल्या दोघांवर तिघा अज्ञातांनी गोळीबार केला. यात दोघे जखमी झाले आहेत.

तुळिंज: मुंबईजवळील पालघर जिल्ह्यातील नालासोपारा येथे रविवारी रात्री तिघा अज्ञात व्यक्तींनी एका रेस्तराँ आणि बारबाहेर उभ्या असलेल्या दोघांवर गोळीबार केला. यात ते जखमी झाले आहेत. हल्लेखोरांनी चेहरे रुमालाने झाकलेले होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नालासोपारा पूर्वेकडील मोरगावमध्ये रविवारी रात्री नऊच्या सुमारास ही घटना घडली. बलराम गुप्ता आणि राजू बेल यांच्यावर तिघांनी गोळीबार केला.

हे दोघेही बारच्या बाहेर उभे होते. त्याचवेळी अचानक तिघांनी हल्ला केला. यात दोघेही जखमी झाले आहेत. इतकेच नाही तर त्यातील एकावर वार केले. हल्लेखोर दुचाकीवरून आले होते. त्यांचे चेहरे झाकलेले होते.

या हल्ल्यात जखमी झालेल्या दोघांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. गुप्ता याची प्रकृती स्थिर आहे. मात्र, राजू याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. राजूवर गोळी झाडली असून, त्याच्या डोक्यावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. सूत्रांच्या माहितीनुसार, हल्लेखोरांनी चार गोळ्या झाडल्या. त्यातील तीन गोळ्या या पीडितांना लागल्या आहेत. तिन्ही हल्लेखोरांनी मास्क घातले होते. आपापसांतील वादातून हा हल्ला झाल्याचे




सांगितले जात आहे. दोघे कुठे असतील याची माहिती आरोपींना असावी. त्याआधारे त्यांनी हल्ल्याचा कट रचला होता, असे प्राथमिक तपासातून स्पष्ट होत आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत.

## पुण्याहून प्रवाशांना घेऊन मुंबईला निघाला होता कॅबचालक, मध्यरात्री वाटेतच...



हिंजवडी: पुण्यातील भूमकर चौकात एका कॅबचालकाला लुटल्याची घटना शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणी हिंजवडी पोलिसांनी चौघांना अटक केली असून, त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कॅबचालक पुण्यातून प्रवाशांना घेऊन मुंबईकडे निघाला होता. शनिवारी मध्यरात्री भूमकर चौकात दुचाकीवरून आलेल्या व्यक्तींनी कॅब अडवली. चाकूचा धाक दाखवून त्यांच्याकडील रोकड आणि मोबाइल फोन घेतला आणि ते पसार झाले. बाळासाहेब बंडगर या काळेवाडीतील कॅबचालकाने या प्रकरणी हिंजवडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी तपास करून चौघांना अटक केली आहे. सलमान शेख, शुभम जाधव, प्रेम पोतदार आणि ललित करोटिया अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्या आणखी एका साथीदाराविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बंडगर याला शुक्रवारी रात्री उशिरा प्रवासी भाडे आले. तो पुण्याहून प्रवाशांना घेऊन मुंबईच्या दिशेने निघाला होता. मध्यरात्री पावणेदोन वाजताच्या सुमारास भूमकर चौकात कार आली असता, आरोपींनी दुचाकी आडवी घातली आणि चाकूचा धाक दाखवला.

## तरुणाला भरदुपारी भोसकले; औरंगाबादमधील थरारक घटना

औरंगाबाद: प्लॉटच्या वादावरून भरदुपारी एका गटाने युवकाच्या पोटात चाकू खुपसला. रक्ताने माखलेला चाकू घेऊन हल्लेखोर अन्य युवकाचा पाठलाग करत होते. हा थरार शनिवारी दुपारी विजयनगर चौकापासून काही अंतरावर घडला. हल्ल्यानंतर उडालेला गोंधळ आणि आसपासचे नागरिक जमू लागल्यामुळे हल्लेखोर पळून गेले. दरम्यान, या प्रकरणात पुंडलिक नगर पोलिसांनी चार जणांना अटक करण्यात आली आहे.

ऋषिकेश मोरे असे जखमी तरुणाचे नाव आहे. विजयनगर ते कालिका माता मंदिरच्या रस्त्यावर भास्कर मोरे यांनी सखुबाई म्हस्के यांच्याकडून जागा विकत घेतली होती. मात्र, राहुल नरवडे याने या जागेवर दावा करीत जागा बळकविण्यासाठी हा हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विजयनगर ते कालिका माता मंदिराच्या रस्त्यावर भास्कर मोरे यांनी एका महिलेकडून जमीन खरेदी केली




होती. या जमिनीवर दावा सांगत तीन-चार पुरुष व चार-पाच महिला शनिवारी (१३ फेब्रुवारी) या विजयनगरच्या निर्माणाधीन बांधकामाजवळ आले. त्यांनी या ठिकाणी त्या घरावर ताबा मिळविण्याचा प्रयत्न केला. ही जागा म्हस्के यांच्याकडून खरेदी केल्याचे राजाराम मोरे यांनी सांगितले. ताबा घेण्यासाठी विरोध असल्याचा पाहून काही जणांनी हाणामारी करण्यास सुरुवात केली. यातील एकाने महेश भास्कर मोरे (१९, रा. बाळकृष्ण मोरे, गारखेडा) याच्यावर चाकूहल्ला केला.

यात महेशच्या बोटांना जखम झाली. त्यानंतर महेश कालिका मंदिराकडे पळाला. त्यानंतर हल्लेखोरांनी ऋषिकेश म्हस्के याच्या पोटावर वार केला. त्यानंतर हल्लेखोर रक्तात माखलेला चाकू घेऊन विनय मोरे याच्यावर धावून गेला. घटनास्थळी नागरिक जमा होऊ लागल्यानंतर हल्लेखोर दोन साथीदारांबरोबर मोटारसायकलवरून पळून गेले. जखमी झालेल्या ऋषीकेश मोरे याला उपचारासाठी खासगी रूग्णालयात दाखल करण्यात आले.

या प्रकरणाची माहिती मिळताच घटनास्थळी पुंडलिकनगरचे सहाय्यक पोलिस निरिक्षक घनश्याम सोनवणे तसेच अन्य पोलिस कर्मचारी पोहोचले. यानंतर पोलिस उपायुक्त विवेक गिऱ्हे यांनीही घटनास्थळी जाऊन पाहणी केली.

ऋषिकेश मोरेसह अन्य दोघांवर हल्ला करणाऱ्या राहुल नरवडे (३३, रा. निर्मलनगर, सातारा परिसर), शेख हुसेन दादा (४०, रा. नुरानी मजीद, गारखेडा), हाशम शेख चाँद (३८, रा. साईनगर, भारतनगर) आणि शेख इमरान (३२, रा. नुरानी मशीद, गारखेडा) या चार जणांना अटक करण्यात आले आहे. ही अटक हल्ला झाल्याच्या काही तासातच पुंडलिकनगर पोलिसांनी अटक केले.

या परिसरातील पीओपी दुकानामध्ये सीसीटीव्ही कॅमेरा असून, त्यामध्ये ऋषिकेशवरील हल्ल्याचे चित्रिकरण चित्रित झाले होते. हल्ला केल्यानंतर तेथून पळ काढत असताना, नरवडे पुन्हा हुसेनच्या दुकानात आला.

त्याने तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेले फुटेज डीलिट करण्यासाठी डिव्हीआरवर सॉफ्टवेअर टाकले. त्यामुळे पोलिस फुटेज तपासण्यासाठी गेले असता, त्यांना कोणतेही चित्रिकरण दिसले नाही.

त्यावरून पोलिसांनी हुसेन व त्याचा भाऊ इक्बाल यांना ताब्यात घेतले आहे.

## मामीसोबत तरुणाचे होते अनैतिक संबंध; एका नाल्यात आढळला मृतदेह



बुलंदशहर: उत्तर प्रदेशातील बुलंदशहर येथील मेंककोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका नाल्यात अज्ञात तरुणाचा मृतदेह आढळून आला होता. या हत्येच्या घटनेचा उलगडा करतानाच पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली. अनैतिक संबंधांवरून तरुणाची गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती, अशी माहिती तपासातून उघड झाली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, मृत तरुणाचे आरोपीच्या आईसोबत अनैतिक संबंध होते. यावरून हे हत्याकांड घडले. पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे. २१ जानेवारी रोजी अज्ञात तरुणाचा मृतदेह एका नाल्यात आढळला होता. राहुल असे या तरुणाचे नाव असल्याचे तपासात समोर आले. तो ग्रेटर नोएडा येथील खोदना कला गावातील रहिवासी होता. मृतदेह आढळून आल्यानंतर या घटनेचा तपास पोलीस करत होते. राहुल याचे अभिषेक याच्या आईसोबत अनैतिक संबंध होते. अभिषेकची आई ही राहुल याची नात्याने मामी होती. या दोघांच्या अनैतिक संबंधांची माहिती अभिषेकला मिळाली होती. त्यानंतर त्याने राहुलच्या हत्येचा कट रचला होता. राहुलची हत्या करण्यासाठी त्याने मित्र हिमांशूची मदत घेतली. ९ जानेवारी रोजी दोघांनी गोळ्या घालून राहुलची हत्या केली होती. त्यानंतर त्याचा मृतदेह कोट गावातील नाल्यात फेकून दिला होता. चिटहेरा येथील अभिषेक आणि हिमांशू या दोघांना या हत्या प्रकरणात पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्या माहितीवरून गुन्ह्यात वापरलेली कार आणि पिस्तुल पोलिसांनी जप्त केले आहे. राहुल गुन्हेगारी प्रवृत्तीचा होता.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्कः-9594418181 / 8424989898